| MHWS08001585-2020 | दाखल दिनांक : २१/१२/२०२०<br>नोंदणी दिनांक : २१/१२/२०२०<br>निकाल दिनांक : १६/०३/२०२६<br>कालावधी : ०५ व. ०२ म. २६दि. |
|---|---|

**भाग-'अ'**

**अर्ज क्र. ३२**

**(Title Page of the Judgment)**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(i) नुसार)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी(कोर्ट नं. २), रिसोड यांचे न्यायालयात**

**(समक्षः श्री. दिनेश मु. गायकवाड)**

**नि. फौ. ख. क्र.७२५/२०२०** **नि. क्र.३३**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस स्टेशन, रिसोड,<br>**ता. रिसोड, जि. वाशिम.** | **...अभियोगपक्ष** |
| **विरुध्द** | |
| **१. राजेश भगवान राठोड,**<br>वय - ३० वर्षे, धंदा - शेती,<br>**२. बद्री मोहन राठोड,**<br>वय - ३६ वर्षे, धंदा - शेती,<br>दोघे रा. मांडवा, ता. रिसोड, जि. वाशिम. | **...आरोपी** |

---

**दोषारोप-भा.दं.वि. कलम ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये.**

---

उपस्थिती - श्री. एम. एच. मनवर - सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता
श्री. एस. एफ. जाधव - आरोपींतर्फे विधिज्ञ

---

**भाग–'ब'**

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गुन्हा घडल्याचा दिनांक | २५/०८/२०२० |
| ०२. | प्रथम खबर अहवाल दिनांक | २५/०८/२०२० |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २१/१२/२०२० |

| | | |
|---|---|---|
| ०४. | दोषारोप निश्चिती दिनांक | १७/१०/२०२४ |
| ०५. | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १७/१०/२०२४ |
| ०६. | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १६-०३-२०२६ |
| ०७. | न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/०३/२०२६ |
| ०८. | निकाल सुनावनीचा दिनांक | १६/०३/२०२६ |

## आ रो पी चा त प शि ल

| अनु. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हा कलम | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ अंतर्गत भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | राजेश भगवान राठोड, | फौ.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे नोटीस | १९/०८/२०२४ | भा.दं.वि. चे कलम ३४१, ५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | – | – |
| ०२. | बद्री मोहन राठोड, | | | | | | |

## भाग-क
## ( फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(iii) नुसार )
## सा क्षी दा रां ची या दी

**(अ) अभियोगपक्ष/सरकार पक्ष -**

| अनु.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१. | आसाराम विठोबा मुंढे | १९ | फिर्यादी |
| ०२. | भागवत ज्ञानबा घुगे | २५ | पंच |
| ०३. | बाबुराव पंढरी सिरसाठ | २८ | सक्षीदार |
| ०४. | भिमराव वसराम साबळे | २९ | साक्षीदार |
| ०५. | भगवान राजाराम केदार | ३० | साक्षीदार |

**(ब) बचाव पक्षाचे आणि (क) न्यायालयीन साक्षीदार असतील तर -**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| — | — | — |

## कागदपत्रांची यादी न्यायालय निशाणी क्रमांक

## (ड) अभियोग पक्ष

| अनु.क्र. | कागदपत्रे | नि.क्र. |
|---|---|---|
| ०१. | जबानी रिपोर्ट | २० |
| ०२. | प्रथम खबर अहवाल | २१ |
| ०३. | घटनास्थळ व जप्ती पंचनामा | -- |
| ०४. | क्युरी पत्र | -- |
| ०५. | एक्स-रे रिपोर्ट | – |
| ०६. | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र | -- |
| ०७. | जखमी फॉर्म | – |
| ०८. | फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे आरोपीची जबानी | ३१ व ३२ |

## (इ) मुद्देमाल तपशिल-

| अनु.क्र. | साहित्य वस्तू | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

---

## न्यायनिर्णय

(दि.१६/०३/२०२६ रोजी घोषित)

---

प्रस्तुत आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान (संक्षिप्त भा.दं.वि.) कलम ३४१,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

२. दि.२५/०८/२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजताचे सुमारास फिर्यादी हे ग्राम मांडवा येथील ज्ञानेश्वर विद्यालय येथे मुख्याध्यापक असून त्यांनी त्यांचे शाळेवरील शिक्षक नामे भगवान राजाराम केदार व बाबुराव पंढरी सिरसाठ तसेच शाळेवरील शिपाई पिराजी तुकाराम साबळे व भिमराव वसराम जाधव अशा चार कर्मचाऱ्यांना विद्यालयाचे तारकुंपणाचे डागडुगी करिता नेमून दिले होते. सदर कर्चचारी तारकुंपणाचे डागडुगीचे काम

करत असतांना आरोपी तेथे आले व सदर कर्मचाऱ्यांचे अंगावर मारण्यासाठी धावून आले व आमच्या शेताजवळील तारकुंपण व्यवस्थीत करु नका असे म्हणून विद्यालयातील हद्दीतील तारकुंपणाचे काम अडविले व म्हणाले की, आम्हाला शेतात जाण्याकरिता हा मार्ग सोपा आहे, असे म्हणून त्यांनी सदर कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली. तेव्हा त्यांच्या भांडणाचा आवाज ऐकूण शाळेतील इतर कर्मचारी व मुख्याध्यापक ते आले व आरोपींना समजाविण्याचा प्रयत्न करत होते. परंतु आरोपींनी काहीएक न ऐकता सर्वांना शिवीगाळ केली व जो कोणी तार कुंपण व्यवस्थीत करील त्याला आम्ही जीवाने मारील अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द सदरची तक्रार पोलीस स्टेशन रिसोड येथे दाखल केली आहे.

३. सदर घटनेबाबत फिर्यादीने दि.२५/०८/२०२० रोजी पो.स्टे., रिसोड येथे दाखल केलेल्या फिर्यादवरुन गु.र.नं.६४७/२०२० हा नोंदविण्यात आला. सदर अपराधाचा तपास पो.हे.कॉ. अनिल प्रल्हाद कातडे ब.नं.२११ यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला व साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे नोटीस दिली व तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द वरील कलमान्वये नि.क्र.१७ वर दोषारोप निश्चित केले. आरोपींनी सदरचे दोषरोप नाकबूल केले व संपरिक्षेस सामोरे जाणार असल्याचे सांगितले.

५. संपरिक्षेदरम्यान अभियोगपक्षाच्या वतीने एकूण पाच साक्षीदारांचा पुरावा नोंदविला, त्याबाबतचा तपशिल म्हणजेच साक्षीदाराचे क्रमांक, नाव, पुराव्याचे स्वरुप इत्यादी बाबींचे तपशीलवार वर्णन यासोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद करण्यात आलेले आहे. अभियोगपक्ष उर्वरीत साक्षीदारांना वेळोवेळी साक्षीसमन्स काढून देखील हजर ठेवू शकलेला नाही, इत्यादी बाबींचा विचार करता नि.क्र.१ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. आरोपींचे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणेचा जबाब नि.क्र.३१ व ३२ वर

नोंदविण्यात आले. सदर जबाब व आरोपींच्या वतीने घेण्यात आलेल्या उलटतपासावरुन खोटया मजकुराची केस करुन गुंतवलेचा बचाव घेतल्याचे दिसून येते.

७. अभियोग पक्षातर्फे श्रीमती एम. एच. मनवर सहाय्यक सरकारी आभियोक्ता व आरोपींतर्फे श्री. एस. एफ. जाधव यांचा युक्तिवाद ऐकला.

८. प्रस्तुत प्रकरणी निकाली काढत असताना अभियोग पक्षाची हकीकत, साक्षी पुरावा व युक्तीवाद विचारात घेता खालील मुद्दे/वादप्रश्न व त्यावरील निष्कर्ष कारणासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२५/०८/२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजताच्या दरम्यान मौजे मांडवा येथील ज्ञानेश्वर विद्यालयातील आवारात आरोपींनी संगणमत करुन शाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांचे काम करण्यापासून बळजबरीने गैरमार्गाने प्रतिबंधीत केले व त्यायोगे भा.दं.वि. कलम ३४१ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी** |
| २. | वर नमूद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमताने फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करुन उद्देशपूर्वक अपमान केला व प्रक्षोभित केले आणि त्या प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अपराध घडावा असा उद्देश होता व त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३. | वर नमूद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदारांना जीवे मारण्याची धमकी दिली व | |

| | | |
|---|---|---|
| | फौजदारीपात्र धाक दपटशा केला व त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## – कारणमिमांसा –

**मुद्दे क्र.१ ते ३ करिता** –

**९.** मुद्दे क्र.१ ते ३ हे एकाच घटनेचा भाग असल्याने व पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे एकत्रीत विवेचन करण्यात आले आहे.

**१०.** फिर्यादी (सा.क्र.१) यांच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, दि.२५/०८/२०२० रोजी शाळेवरील शिपाई व शिक्षक हे तारेचे कुंपन व डागडुगी करत असतांना आरोपी तेथे आले व त्यांनी शिक्षकांशी वाद घालून शिपाई व शिक्षक यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी ते बाहेर आले व आरोपींना समजावून सांगत असतांना त्यांना देखील आरोपींनी शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली व शाळेचे डागडुगीचे कामकाज थांबवीले. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. सदर साक्षीदाराने रिपोर्ट व प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.२० व २१) वर शाबीत केले आहेत.

**११.** अभियोगपक्षाने घटनेमधील महत्वाचे व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार बाबुराव सिरसाठ (सा.क्र.३), भिमराव जाधव (सा.क्र.४) व भगवान केदार (सा.क्र.५) यांना तपासले आहे. ते ज्ञानेश्वर विद्यालय मांडवा येथील कर्मचारी आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपींमध्ये व त्यांच्यामध्ये शाब्दीक बोलाचाल झाली व त्याव्यतिरीक्त काहीही घडले नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनास

सहाय्य केले नसल्याने त्यांना उत्तरसुचक स्वरुपाचे प्रश्न विचारण्यात आले मात्र त्यामधून देखील अभियोगपक्षाच्या कथनास मदत होईल असे काही निष्पन्न झाले नाही.

**१२.** सा.क्र.२ भागवत घुगे हे पंच साक्षीदार आहेत. त्यांनी देखील त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही व पंचनाम्यामधील मजकूराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या कथनास सहाय्य केले नसल्याने त्यांना उत्तरसुचक स्वरुपाचे प्रश्न विचारण्यात आले मात्र त्यामधून देखील अभियोगपक्षाच्या कथनास मदत होईल असे काही निष्पन्न झाले नाही.

**१३.** अभियोगपक्षाने सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी यांच्या कथनास साक्षीदार क्र.३ ते ५ यांनी दुजोरा दिलेला नाही व आरोपींमध्ये व त्यांच्यामध्ये केवळ शब्दीक बोलाचाल झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे प्रत्यक्षात घटना घडली किंवा नाही याबाबत संशय निर्माण होतो. पंच साक्षीदार यांनी देखील अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोगपक्षाने तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदवली नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा शाबीत झालेला नाही. एकूणच आरोपींविरुध्द समोर आलेला पुरावा हा अपुरा असून कथीत घटनेविषयी संदिग्धतः निर्माण करणारा आहे. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनावर संशयाची सावली निर्माण होते. आरोपींवरील ठेवलेले दोषारोप संशयापलीकडे जावून शाबीत करण्यास अभियोगपक्षास अपयश आले असल्याने आरोपी हे निर्दोष होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी देत आहे

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u> –**

**१४.** वरील विवेचानावरुन आरोपींवर ठेवलेले आरोप निसंशयरित्या सिध्द न झाल्यामुळे आरोपींना प्रस्तुत खटल्यामधून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित आहे. सबब, मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहेः

# आदेश

१) आरोपींना फौ.प्र.सं. कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड विधान गुन्हा कलम ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ मधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींचे जामीन बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येतो, त्यास मुक्त करण्यात येते.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचे दिलेले जामीन बंधपत्र पुढील सहा महिन्याकरीता अस्तित्वात राहील.

(पीठासनावरुन उद्घोषित करण्यात आले.)

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.03.18 11:29:53 +0530

दि.१६/०३/२०२६.
रिसोड.

**(दिनेश मु. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Judgment/Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade, (Grade III) |
| Name of court | : | Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 16.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 16.03.2026 |
| **Order uploaded on** | **:** | **18.03.2026** |